<table>
<tr><td colspan="5">पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template</td></tr>
<tr><td colspan="3">विभागाचे नाव</td><td colspan="2">वित्त विभाग</td></tr>
<tr><td>अ. क्र.</td><td>प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping)</td><td>बाब</td><td>माहिती</td><td>शेरा</td></tr>
<tr><td>PC1</td><td rowspan="3">प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and Classification)</td><td>प्रक्रिया नाव</td><td>जिल्हा परिषदेचे मूळ व पुरवणी अंदाजपत्रक तयार करणे</td><td></td></tr>
<tr><td>PC2</td><td>विभागाचे नाव</td><td>वित्त विभाग</td><td></td></tr>
<tr><td>PC3</td><td>कार्यासन संकेतांक (उदा. आस्था १, लेखा ४)</td><td>अंदाज-3</td><td></td></tr>
<tr><td>PP1</td><td rowspan="6">प्रक्रिया प्रस्तावित करणे (process proposal)</td><td>प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी (Maker)- पदनाम</td><td>वरिष्ठ सहाय्यक</td><td></td></tr>
<tr><td>PP2</td><td>संदर्भीय न्यायालय निकाल, कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, शासन पुस्तके,पत्रे क्रमांक</td><td>महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (अर्थसंकल्पीय अंदाज) नियम 1966 चे नियम 8 व 9 नुसार व म.जि.प.व पं.स.अधिनियम 1961 नियम 137 व 138 नुसार तयार करणे</td><td></td></tr>
<tr><td>PP3</td><td>अर्थ विषयक बाबीकरिता कायदा, लेखासंहिता,नियम, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, पत्रं क्रमांक</td><td>1) 10% महिला व बालकल्याण निधी देताना ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि. 2 सप्टेंबर 1993 2) 20% समाज कल्याण निधी देताना ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.20/10/1999 3) 20% दुरूस्ती देखभाल निधी देताना ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.17/11/1986 नुसार 4) 5% अपंग कल्याण निधी देताना ग्रामविकास विभाग दि. 25/06/2018 अन्वये देय आहे. 5) जिल्हा परिषदा, विधानसभा व लोकसभा निवडणूक कालावधीत ग्रामविकास विभाग महाराष्ट्र,यांचेकडील पत्रानुसार अंदाजपत्रक तयार करणे व त्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे यांची मान्यता घेणेबाबतचे पत्र प्राप्त होत आहे</td><td></td></tr>
<tr><td>PP4</td><td>प्रस्तावासोबत ( आवश्यक असल्यास) जोडावयाची कागदपत्रे उदा. विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी</td><td>अंदापत्रकासाठी आवश्यक प्रपत्र उदा. 1) मुक्त महसुली प्रपत्र, 2) अंदाजपत्रकासाठी प्रत्यक्ष उपलब्ध निधी प्रपत्र 3) मागील तीन वर्षाचे जमा अंदाजपत्रक व प्रत्यक्ष जमा प्रपत्र 4) मागील तीन वर्षाचे खर्चाचे अंदाजपत्रक व प्रत्यक्ष खर्च प्रपत्र 5) मागील तीन वर्षाची सरासरी जमा प्रपत्र 6) चालू वर्षातील प्रत्यक्ष जमा व अंदाजीत जमा होणारा निधी प्रपत्र 7) 10% महिला व बालकल्याण निधी प्रपत्र 8) 20% समाजकल्याण निधी प्रपत्र 9) 20% दुरूस्ती देखभाल निधी प्रपत्र 10) 5% अपंग कल्याण निधी 11) मुद्रांक शुल्क निधी प्रपत्र 12) बांधील बाबी निधी प्रपत्र 12) योजना निहाय प्रस्तावित केलेले अंदाजपत्रकिय तरतुद प्रपत्र</td><td></td></tr>
<tr><td>PP5</td><td>प्रक्रिया प्रस्तावित करताना यादी/ आराखडा बाबत शिफारस करणारे प्राधिकरण/समिती</td><td>अंदाजपत्रक तयार केलेनंतर वित्त समितीने अवलोकन करून मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस आवश्यक अंतिम मान्यता जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची आवश्यक आहे.</td><td></td></tr>
<tr><td>PP6</td><td>प्रक्रिया प्रस्तावित करताना आस्थापनाविषयक, तांत्रिक आवश्यक माहिती - याचे शासनमान्य स्रोत, पुस्तके</td><td>निरंक</td><td></td></tr>
</table>

<table>
<tr><td colspan="5">पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template</td></tr>
<tr><td colspan="3">विभागाचे नाव</td><td colspan="2">वित्त विभाग</td></tr>
<tr><td>अ. क्र.</td><td>प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping)</td><td>बाब</td><td>माहिती</td><td>शेरा</td></tr>
<tr><td>PP7</td><td rowspan="4">प्रक्रिया प्रस्तावित करणे (process proposal)</td><td>प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम जसे परीक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प , विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी</td><td>निरंक</td><td></td></tr>
<tr><td>PP8</td><td>प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पंस/ ग्रापं/ जि. प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये यांचेकडून प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस</td><td>अंदाजपत्रक तयार करणेपूर्वी नाविन्यपुर्ण लोकहिताच्या योजना सुचविणेसाठी सर्व जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापती यांना योजना सुचविणेबाबत कळविणेत येते तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 137(3) नुसार प्रत्येक पंचायत समितीने मान्य केलेले अर्थसंकल्पीय अंदाज (25 फेब्रुवारी नंतर) नसेल अशा तारखेला जिल्हा परिषदेकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा परिषद खाते प्रमुख यांचेकडून विषय समितीने योजनाहिनाय प्रस्तावित केलेली मागणी विहीत प्रपत्रात आवश्यक आहे.</td><td></td></tr>
<tr><td>PP9</td><td>प्रक्रिया प्रस्तावित करताना शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे / महामंडळे / मनपा/ नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडून प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस</td><td>1) नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र शासन पुणे कार्यालयाकडून देय असलेले मुद्रांक शुल्क अनुदान आदेश 2) कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन कार्यालय यांचे कडून प्राप्त होणारा पाणीपट्टी उपकर अनुदान आदेश</td><td></td></tr>
<tr><td>PP10</td><td>तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ/क.प्र.अ/ पर्यवेक्षीय अधिकारी )</td><td>सहाय्यक लेखाधिकारी</td><td></td></tr>
<tr><td>PA1</td><td rowspan="3">प्रक्रिया मंजुरी (process approval )</td><td>प्रक्रिया मंजुरीचे अधिकार ज्या संदर्भान्वये निश्चित करून देण्यात आले आहेत , तो संदर्भ</td><td>महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 109 (एक) नुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांच्या 137 खाली तयार केलेल्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजाचे, तिला आवश्यक वाटेल असे तपशीलवार परिनिरीक्षण करील तसेच (दोन) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या कलम 138 खाली तयार केलेल्या सुधारित किंवा पुरवणी अथसंकल्पीय अंदाजाचे त्या रीतीने परिनिरीक्षण करील तसेच जिल्हा परिषदेचे अर्थसंकल्पीय अंदाज प्रत्येक वर्षी (27 मार्चनंतर ) नसेल अशा तारखेला मान्य करील याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 137 (5) नुसार विहित केलेल्या दिनांकास किंवा त्यापुर्वी जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पीय अंदाज मान्य करण्यास कसूरकेल्यास पोट-कलम (1) खाली तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज मुख्य कार्यकारी अधिकारी राज्य शासनाकडे पाठवील व ते शासन त्यात फेरबदल करून किंवा न करता त्यास मान्यता देईल. त्यानंतर त्यांना जिल्हा परिषदेकडून रीतसर मान्यता देण्यात आली आहे, असे मानण्यात येईल.</td><td></td></tr>
<tr><td>PA2</td><td>प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी</td><td>1) मुक्त महसुली अचुक काढणेत आलेली आहे का 2) मागील वर्षाचा अनुशेष सबंधीत विभाग (मबाक, समाजकल्याण, पाणी पुरवठा दुरूस्ती देखभाल, अपंक कल्याण निधी तसेच मुद्रांक शुल्क वाटप न केलेला निधी इ.) यांना दिलेला आहे का 3) एकुण अंदाजपत्रकाच्या 5% निधी अपंग कल्याणसाठी राखून ठेवला आहे का</td><td></td></tr>
<tr><td>PA3</td><td>मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख /इतर )</td><td>1) उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी 2) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, 3) मा. वित्त समिती, 4) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, 5) मुख्य कार्यकारी अधिकारी,6) उपाध्यक्ष,जि.प., 7) अध्यक्ष, जि.प.पुणे 8) मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा</td><td></td></tr>
<tr><td>PA4</td><td rowspan="2">प्रक्रिया मंजुरी (process approval )</td><td>यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव</td><td>निरंक</td><td></td></tr>
<tr><td>PA5</td><td>Endosement (समर्थन ) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ /अति मुकाअ/ संबधित खातेप्रमुख)</td><td>मुख्य कार्यकारी अधिकारी</td><td></td></tr>
</table>

<table>
<tr><th colspan="5">पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template</th></tr>
<tr><th colspan="3">विभागाचे नाव</th><th colspan="2">वित्त विभाग</th></tr>
<tr><th>अ. क्र.</th><th>प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping)</th><th>बाब</th><th>माहिती</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>PM1</td><td rowspan="6">प्रक्रिया त्रुटीशोध (process Mapping )</td><td>प्रक्रिया मधील, ज्या बाबी आदेशान्वये निश्चित करून दिल्या नाहीत परंतु अनावश्यक आहेत अश्या बाबी ( असल्यास)</td><td>निरंक</td><td></td></tr>
<tr><td>PM2</td><td>मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी</td><td>निरंक</td><td></td></tr>
<tr><td>PM3</td><td>प्रक्रिया पूर्ततेनंतर न होणारी उद्दिष्टपूर्ती, उरणारे दायित्व, तक्रारी, शक (Audit point)</td><td>प्रक्रिया पूर्ततेनंतर आर्थिक वर्ष संपलेनंतर जो निधी अखर्चित रहातो याबाबत मा. आयुक्त, पुणे विभाग यांचे तपासणीमध्ये याबाबत अनुदान उपलब्ध असून देखील खर्च करणेत आलेला नाही असा शक घेणेत येत आहे.</td><td></td></tr>
<tr><td>PM4</td><td>निर्धारित वेळेपेक्षा जास्त वेळ घेणाऱ्या उपप्रक्रिया /बाबी</td><td>जिल्हा परिषद निधीचे अंदाजपत्रक तयार करताना विभागांना उपलब्ध करून द्यावयाचा योजना निहाय निधीची तरतुद निर्धारित वेळेत पुर्ण होत नाही. त्यामुळे अंदाजपत्रक तयार करणे व छपाई करणेसाठी विलंब होत आहे.</td><td></td></tr>
<tr><td>PM5</td><td>तांत्रिक (Technical) ज्ञान आवश्यक आहे, परंतु प्रक्रियांमध्ये अश्या मनुष्यबळाचा समावेष नाही, अश्या बाबी</td><td>निरंक</td><td></td></tr>
<tr><td>PM6</td><td>प्रकिया उद्दिष्ट फलितकरीता , समाजामध्ये प्रचार प्रसिद्धी इ. आवश्यकतेनुसार</td><td>जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक मंजुर केलेनंतर याबाबत ठळक बाबींचा समावेश वर्तमान पत्राव्दारे समाजामध्ये प्रचार व प्रसिध्दीसाठी करून अंदाजपत्रक जिल्हा परिषद वेबसाईडवर अपलोड केले जात आहे.</td><td></td></tr>
<tr><td>PI1</td><td rowspan="3">प्रक्रिया सुधारणा (process improvization )</td><td>अचुकता वेळेची बचत , मनुष्यबळ कार्यक्षम वापर , पारदर्शकता याकरिता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोग्या उपप्रक्रिया /बाबी</td><td>वेळेची बचत होणेसाठी जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रकाचे भाग-1 ते भाग-5 सर्व संगणकीय एक्सेल वर्कसीट मध्ये तयार करणेत आलेले आहे. की ज्यामुळे योजनांच्या निधीत उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीमध्ये बदल झाल्यास ते सहज व पारदर्शकपणे करता येते.</td><td></td></tr>
<tr><td>PI2</td><td>वेळखाऊ उपप्रक्रिया /बाबी यासाठी सर्वमान्य व नियमात बसणारे पर्याय</td><td>निरंक</td><td></td></tr>
<tr><td>PI3</td><td>प्रक्रिया पूर्ततेनंतर न होणारी उद्दिष्टपूर्ती, तक्रारी, शक (Audit point) होऊ नये म्हणुन करता येण्याजोगे बदल</td><td>1) जिल्हा परिषद निधी त्या त्या वर्षात जास्तीत जास्त खर्च होणेचे दृष्टीने Google Spreadsheet तयार करणेत आलेले आहे. यामध्ये साप्ताहीक बैठकीमध्ये आढावा घेणेत येतो. कमी खर्च असलेल्या योजनांबाबत काही अडचणी असेल तर चर्चा करून अचडचणी दुर केल्या जातात.2) मागील वर्षाचे अंदाजपत्रकात ज्या विभागांनी 90% पेक्षा जास्त खर्च केला आहे त्या विभागांना पुढील वर्षाचे अंदाजपत्रकात अधिकचा निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जेणे करून 90% पेक्षा कमी खर्च असणारे विभाग योजनांना तरतुद अधिकची मिळविणेसाठी विहीत कालावधीत नियोजन करून जास्तीत जास्त निधी खर्च करतील. त्यामुळे जिल्हा परिषद निधीमध्ये स्पील रहाणारा नाही.</td><td></td></tr>
</table>

| पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template | | | | |
|---|---|---|---|---|
| विभागाचे नाव | | | वित्त विभाग | |
| अ. क्र. | प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping) | बाब | माहिती | शेरा |
| PI4 | प्रक्रिया सुधारणा (process improvization ) | आवश्यक असल्यास प्रचार प्रसिध्दीची पद्धत, नियोजन | जिल्हा परिषदेच्या व शासनाच्या योजना ग्रामीण भागातील लोकांना माहिती होणेसाठी किंवा प्रसिध्दी होणेसाठी जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकात जि.प.व शासन योजनांची प्रचार/प्रसिध्दी व मार्गदर्शन करणेसाठी योजना कार्यान्वीत केलेली आहे. | |
| PI5 | | तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम | निरंक | |
| PI6 | | मुळ संकल्पना, उद्देश , लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करायच्या बाबी | निरंक | |